पुढारी

# विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट इमारतीचे सोमवारी भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट इमारतीचे भूमिपूजन सोमवारी (दि. २६) दुपारी १२ वाजता राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. भूमिपूजन समारंभास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

2 4 JUN 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणच्या ऑनलाईन प्रवेशाला प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी. ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम, एम. एस्सी (गणित) आदी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे, अशी माहिती संचालक डॉ.डी. के. मोरे यांनी दिली.

दूरशिक्षणची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या ८६ अभ्यासकेंद्राच्या प्रवेशाचा समावेश असेल. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची सर्व माहिती उपलब्ध आहे. httpë//sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ या ऑनलाईन लिंकवर आपला प्रवेश निश्चित करावयाचा आहे. असे आवाहन संचालक डॉ. मोरे यांनी केले आहे.

**दूरशिक्षण,ऑनलाईन शिक्षण केंद्राची वैशिष्ट्ये**

दुहेरी शिक्षण पद्धीची सोय, १२ प्रोग्राम अंतर्गत विविध कोर्से, दुर्गमभागासह ८६ अभ्यासकेंद्राची सोय, विद्यार्थ्यांना अनुभवी शिक्षकामार्फत मार्गदर्शन, शैक्षणिक आणि करिअर विकासाच्या संधी, नोकरी विषयक सल्ला आणि MPSC/ UPSC मार्गदर्शन.

## विद्यापीठ व्यवस्थापन बैठकीत अनेक विषयांना मंजुरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत अनेक विषयांना मंजुरी मिळाली. त्यापैकी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना, बांधकाम समितीचे कामकाज, विद्यापीठातील प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र पदार्थ, भौतिक शास्त्र विज्ञान इत्यादी विषयांना स्वायत्तता देणेबाबतचा निर्णय, यूजीसीकडून पीएचडीचे नवीन रेग्युलेशन्स, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन, प्रकल्पावरील संशोधन सहायकांना रजा देणे, वृक्ष लागवड, तासिका तत्वावर प्राध्यापकांचे मानधन तसेच विद्यापरिषदने केलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगानुसार थकबाकी देणे, विद्यापीठांमध्ये संस्कृत, पाली भाषा अभ्यासक्रम सुरू करणे, स्कूल ऑफ फाइन आर्टस् स्कुलची स्थापना, विविध समित्यांचे नामनिर्देशन, हंगामी शिक्षकांची पदे भरणे, संत तुकाराम गाथेचे निरूपणची दुसरी आवृत्ती आदी विषयांवर चर्चा झाली.

2 4 JUN 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण'च्या अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू

- दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची वैशिष्ट्ये
- दुहेरी पदवीची सोय
- १२ प्रोग्राम अंतर्गत विविध कोर्सेस
- दुर्गम भागासह ८६ अभ्यास केंद्रांची सोय
- ४०० हून अधिक दर्जेदार स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध
- अभ्यासक्रमनिहाय १५०० हून अधिक व्हिडीओ लेक्चर

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम. एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. याबाबतची माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८६ अभ्यास केंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर याची माहिती उपलब्ध आहे.

जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेश घेणार आहेत, त्यांना दूरशिक्षण अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येणार आहे. त्यामुळे दुहेरी पदवीचाही लाभ मिळणार आहे.

लोकमत

# 'दूरशिक्षण'ची प्रवेश प्रक्रिया सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या बी.ए.,बी.कॉम.,एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी (गणित) या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली.

ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन असून दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या ८६ अभ्यास केंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. http://sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ या ऑनलाइन लिंकवर प्रवेश अर्ज करता येणार आहे. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित होणार आहेत, अशा विद्यार्थ्यांना दूरशिक्षण अभ्यासक्रमांना प्रवेशित होता येणार आहे.

2 4 JUN 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाजारपेठ रोजगाराची संधी : डॉ. पडवळ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिकीकरणाच्या खुल्या आर्थिक धोरणामुळे भारतात परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या. त्यामुळे या कंपन्यांमध्ये स्पर्धा वाढू लागली आहे. यातूनच तरुणांसाठी आजची बाजारपेठ ही रोजगाराची संधी आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्लेसमेंट समन्वयक प्रा. आर. डी. पडवळ यांनी केले.

विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत विभागीय केंद्र- सांगली, श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय- सांगली, कन्या महाविद्यालय- मिरज आणि श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील कन्या महाविद्यालय- सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने 'भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि कौशल्य विकास' या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. डी. के. मोरे होते.

या कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. उल्हास माळकर, प्राचार्य डॉ. मानसी गानू, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, डॉ. के. बी. पाटील, डॉ. चांगदेव बंडगर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. व्ही. बी. चौगुले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. सुशांत माने यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. एम. आर. चादरे यांनी केले, तर आभार डॉ. जी. बी. चव्हाण यांनी मानले.

2 4 JUN 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ उन्हाळी सत्रातील ७९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्रांतर्गत आजअखेर ७९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. शुक्रवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ लॉ, बीएस्सी., एम.एस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), बॅचलर ऑफ व्होकेशन, बॅचलर ऑफ जर्नालिझम आदी ३० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार आहेत. परीक्षांसाठी ४ हजार ३०७ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून संलग्न महाविद्यालयांमध्ये तीन गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवाजी'च्या सहा खेळाडूंची निवड

## जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धा चीन


ओंकार कुंभार


सिद्धांत पुजारी


सुदेश्णा शिवणकर


रेश्मा केवटे


राणी मुचंडी


संदेश कुरळे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

चीनमधील चेंगडू येथे २८ जुलै ते ८ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या सहा क्रीडापटूंची भारतीय विश्वविद्यालय संघामध्ये निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये खेळाडूंची निवड झाली आहे. चीनमधील चेंगडू येथे २८ जुलैपासून जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा सुरू होणार आहेत. त्यात शिवाजी विद्यापीठाचे खेळाडू ॲथलेटिक्स आणि लॉन टेनिस दोन क्रीडा प्रकारांत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विद्यापीठाच्या वतीने ॲथलेटिक्समध्ये पाचजण व लॉन टेनिसमध्ये एक असे सहा खेळाडू सहभागी होत आहेत.

> शिवाजी विद्यापीठाच्या सहा खेळाडूंची एकाच वेळी जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी निवड होणे हा विद्यापीठाच्या इतिहासातील महत्त्वाचा क्षण आहे. यंदाच्या मोसमात विद्यापीठाच्या खेळाडूंनी सर्वच स्पर्धांमध्ये कामगिरी उंचावत त्यामध्ये सातत्य राखले. कामगिरीचेच हे फलित आहे.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

ओंकार कुंभार (नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स, इचलकरंजी, ८०० मी. धावणे), सिद्धांत पुजारी (आजरा महाविद्यालय, आजरा, ३००० मी. स्टीपल चेस), सुदेष्णा शिवणकर (यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, सातारा, १०० मी. धावणे व ४ द १०० मी. रिले), रेश्मा केवटे (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन), राणी मुचंडी (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन) व संदेश कुरळे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, लॉन टेनिस) यांचा समावेश आहे.

खेळाडूंना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, शिवाजी विद्यापीठ ॲथलेटिक्स संघाचे प्रशिक्षक रामा पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 JUN 2023
सकाळ

# विद्यापीठाच्या सहा खेळाडूंची जागतिक स्पर्धेसाठी निवड

## चीनमध्ये आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेचे आयोजन


रेश्मा केवटे


राणी मुचंडी


सुदेश्रा शिवणकर


ओंकार कुंभार


संदेश कुरळे


सिद्धांत पुजारी

कोल्हापूर, ता. २३ : चीनमधील चेंगडू येथे २८ जुलै ते ८ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या सहा क्रीडापटूंची भारतीय विश्वविद्यालय संघात निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेत विद्यापीठाच्या खेळाडूंची निवड झाली असल्याची माहिती क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली.

या स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये ओंकार कुंभार (नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स, इचलकरंजी, ८०० मीटर धावणे), सिद्धांत पुजारी (आजरा महाविद्यालय, आजरा, तीन हजार मीटर स्टीपलचेस), सुदेश्ना शिवणकर (यशवंतराव चव्हाण विज्ञान महाविद्यालय, सातारा, १०० मीटर धावणे व ४ बाय १०० मीटर रिले), रेश्मा केवटे (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन), राणी मुचंडी (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन), संदेश कुरळे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, लॉन टेनिस) यांचा समावेश आहे.

यातील ओंकार याने 'खेलो इंडिया' स्पर्धेत रौप्य, अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले आहे. सिद्धांत याने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण, तर 'खेलो इंडिया'मध्ये रौप्यपदकाची कमाई केली आहे. सुदेश्ना हिने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण आणि कांस्य, तर खेलो इंडियात सुवर्ण आणि रौप्यपदक मिळविले आहे. रेश्मा केवटे हिने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण आणि कांस्यपदक आणि खेलो इंडियात रौप्यपदक मिळविले. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत तिने वैयक्तिक व सांघिकही सुवर्णपदक पटकावले आहे. राणी हिने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉस कंट्रीत वैयक्तिक आणि सांघिक रौप्यपदक जिंकले. टेनिसपटू संदेश कुरळे याने पश्चिम विभागीय स्पर्धेत रौप्यपदक तसेच राष्ट्रीय पातळीवरच्या अनेक स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळविले आहे. या खेळाडूंना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रशिक्षक रामा पाटील, डॉ. इब्राहिम मुल्ला, सविता भोसले, अभिजित मस्कर, देवेंद्र बिरनाळे, धनंजय पाटील, उदय शिंदे, बाळासाहेब भोसले, राहुल मगदूम, बळवंत बाबर, मंजूळा पाटील-साखरे यांचे मार्गदर्शन लाभले.

> सहा खेळाडूंची एकाच वेळी जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी निवड होणे, हा शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे. या वर्षी विद्यापीठाच्या खेळाडूंनी सर्वच स्पर्धांमध्ये आपली कामगिरी उंचावली आणि त्यात सातत्य राखले. त्यांच्या या सातत्यपूर्ण कामगिरीचेच हे फलित आहे.
>
> **- डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू**

24 JUN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या सहा खेळाडूंची ऐतिहासिक निवड

## जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी प्रथमच भारतीय संघात संधी : २८ जूलै ते ८ ऑगस्ट दरम्यान चीनमध्ये होणार स्पर्धा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या सहा क्रीडापटूंची विविध क्रीडा प्रकारात भारतीय विश्वविद्यालय संघात निवड झाली आहे. चीनमधील चेंगडू येथे २८ जुलै ते ८ ऑगस्ट दरम्यान या स्पर्धा होणार आहेत. जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये पहिल्यांदाच शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंची निवड झाली असल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली.

भारतीय विश्वविद्यालय संघाची नुकतीच घोषणा करण्यात आली. भारतीय संघात निवड झालेल्या खेळाडूंमध्ये राणी मुचंडी, रेश्मा केवटे, सुदेष्णा शिवणकर, ओंकार कुंभार, सिद्धांत पुजारी, संदेश कुरळे यांचा समावेश आहे. त्यांनी केलेल्या कामगिरीमुळे कोल्हापूर विद्यापीठाचे जागतिक पातळीवर नावलौकिक झाले आहे. या स्पर्धेत भारतीय संघ ॲथलेटिक्स, टेनिस टेबल, लॉन टेनिस, जलतरण, तिरंदाजी, बॅडमिंटन, तलवारबाजी आणि व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होणार आहे.

### शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंची ऐतिहासिक कामगिरी

विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच सहा खेळाडू एकत्रितपणे आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवडले गले आहत. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे खेळाडू ॲथलेटिक्स आणि लॉन टेनिस या दोन क्रीडा प्रकारांत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. यामध्ये ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी पाच व लॉन टेनिस स्पर्धेसाठी एक असे एकूण सहा खेळाडू प्रतिनिधीत्व करणार आहेत.

**निवड झालेल्या खेळाडू, महाविद्यालय व क्रीडा प्रकार असा** : ओंकार कुंभार (नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स, इचलकरंजी, ८०० मीटर धावणे), सिद्धांत पुजारी (आजरा महाविद्यालय, आजरा, ३००० मीटर स्टीपलचेस), सुदेष्णा शिवणकर (यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, सातारा, १०० मी. धावणे व ४ बाय १०० मीटर रिले), रेश्मा केवटे (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन), राणी मुचंडी (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन), संदेश कुरळे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, लॉन टेनिस).


रेश्मा केवटे


राणी मुचंडी


सुदेष्णा शिवणकर


ओंकार कुंभार


संदेश कुरळे


सिद्धांत पुजारी

### निवड झालेल्या खेळाडूंची अन्य कामगिरी अशी

ओंकार कुंभार, सिद्धांत पुजारी यांनी 'खेलो इंडिया' स्पर्धेत रौप्य व अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळविले आहे. सुदेश्ना शिवणकर हिने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये सुवर्ण आणि कांस्य तर खेलो इंडियामध्ये सुवर्ण आणि रौप्य पदक मिळविले आहे. रेश्मा केवटे हिने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण व कांस्य आणि खेलो इंडियामध्ये रौप्य पदक मिळविले आहे. राणी मुचंडी हिने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉस कंट्रीमध्ये वैयक्तीक आणि सांघिक रौप्यपदक मिळवले आहे. टेनिसपटू संदेश कुरळे याने पश्चिम विभागीय स्पर्धेमध्ये रौप्य व राष्ट्रीय स्पर्धांमध्ये जेतेपद मिळवले आहे.

### चॅम्पियनशिपसाठी मोलाचा वाटा

या सहा खेळाडूंनी खेलो इंडिया आणि अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आणून ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी केली आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाला जनरल चॅम्पियनशिप मिळवून देण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे.

या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यापीठ ॲथलेटिक्स संघाचे प्रशिक्षक रामा पाटील, डॉ. इब्राहिम मुल्ला, डॉ. सविता भोसले, अभिजित मस्कर, डॉ. देवेंद्र बिरनाळे, डॉ. धनंजय पाटील, डॉ. उदय शिंदे, डॉ. बाळासाहेब भोसले, डॉ. राहुल मगदूम यांच्यासह सर्व प्रशिक्षक व महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे मार्गदर्शन मिळाले.

**विद्यापीठाच्या इतिहासातील महत्त्वाचा क्षण: कुलगुरू डॉ. शिर्के**

शिवाजी विद्यापीठाच्या सहा खेळाडूंची एकाच वेळी जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी निवड होणे, हा विद्यापीठाच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे. यंदाच्या हंगामात विद्यापीठाच्या खेळाडूंनी सर्वच स्पर्धांमध्ये आपली कामगिरी उंचावली आहे. जागतिक स्पर्धेत देशासह शिवाजी विद्यापीठाचाही नावलौकिक उंचावतील, असा विश्वास वाटतो.